30 NOV 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल युगात लेखनाद्वारे अभिव्यक्त होणे स्वागतार्ह

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : महाविद्यालयीन नियतकालीक स्पर्धा पारितोषिक वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

डिजिटल युगातही विद्यार्थ्यांना लेखनाद्वारे अभिव्यक्त व्हावेसे वाटते आहे, ही बाब अतिशय स्वागतार्ह आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेच्या (सन २०२१-२२) पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, सृजनशीलता वृद्धिंगत व्हावी, यासाठी महाविद्यालयीन नियतकालिकांची स्पर्धा विद्यापीठामार्फत आयोजित केली जाते. या अंकांतून वाङ्मयनिर्मिती करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने ही योजना सन १९७० पासून सुरु आहे. आजतागायत अनेक महाविद्यालयीन नियतकालिकांनी आपले सातत्य टिकविले आहे. काही नियतकालिकांत मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पलिकडे ऊर्दू, कन्नड आणि संस्कृत भाषांमधून लिखान केले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व व लेखन कौशल्य विकासाच्या दृष्टीने नियतकालिक स्पर्धा महत्त्वाच्या आहेत. त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळण्याबरोबरच सुप्तगुण प्रदर्शित करण्याची संधी मिळते. त्यामुळे या स्पर्धेत जास्तीत जास्त महाविद्यालयांनी सहभागी झाले पाहिजे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. राजेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे व सेमिनार विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यंदा सन २०२१-२२च्या स्पर्धेमध्ये ४३ बिगर व्यावसायिक महाविद्यालयांनी आणि १३ व्यावसायिक महाविद्यालयांनी भाग घेतला. यापैकी ३० बिगर व्यावसायिक व ११ व्यावसायिक गटातील महाविद्यालयांतील एकूण २५४ विद्यार्थ्यांनी वैयक्तिक पारितोषिक प्राप्त केली आहेत. यामध्ये १६६ विद्यार्थिनींचा समावेश आहे.

महाविद्यालयांच्या सर्वसाधारण पुरस्कारासाठी विषय तज्ज्ञांकडून नियतकालिकांचे परीक्षण करून, स्वतंत्ररित्या गुणांकनाच्या आधारे बिगर व्यवसायिक व व्यवसायिक गट यामध्ये गुणानुक्रमे प्रथम आलेल्या पहिल्या तीन महाविद्यालयांना फिरते चषक व प्रशस्तिपत्र देऊन प्राचार्य व नियतकालिकांचे संपादकांचा सत्कार केला.

या स्पर्धेतील विजेते महाविद्यालय

बिगर व्यावसायिक गट: मुधोजी महाविद्यालय, फलटण (प्राचार्य डॉ. पी.एच. कदम, प्रा. लक्ष्मीकांत वेळेकर -उदय), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. आरिफ शौकत महात - विवेक), सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा (डॉ. एम. एम. राजमाने, डॉ. दिलीपकुमार कसबे - सद्गुरू). व्यावसायिक गट: तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, वारणानगर, जि. कोल्हापूर (डॉ. एस.व्ही. अणेकर, डॉ. बाळासो साळोखे -होरायझन), आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, आष्टा, जि. सांगली (डॉ. व्ही.एस. पाटील, डॉ. एस. एस. मोहिते - ज्ञानदारंभ), डी.के.टी.ई.चे टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनियरिंग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी, जि.कोल्हापूर (डॉ. श्रीमती एल. एस. अडमुठे, डॉ. आर.डी. शिर्के-अंबर).

30 NOV 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांनी लेखनाद्वारे व्यक्त होणे स्वागतार्ह

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के : नियतकालिक स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**कोल्हापूर :** डिजिटल युगातही विद्यार्थ्यांना लेखनाद्वारे अभिव्यक्त व्हावेसे वाटते आहे, ही बाब अतिशय स्वागतार्ह आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी बुधवारी येथे केले. शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेच्या (सन २०२१-२२) पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सृजनशीलतेची जोपासना व्हावी आणि ती अधिकाधिक वृद्धिंगत व्हावी, विद्यार्थ्यांमध्ये लेखनाच्या ऊर्मी आहेत, त्यांना स्थान देण्यात महाविद्यालयांनी कमी पडू नये.

**विजेत्या महाविद्यालयांची नावे**

बिगर व्यावसायिक गट : मुधोजी महाविद्यालय, फलटण (प्राचार्य डॉ. पी. एच. कदम, प्रा. लक्ष्मीकांत वेळेकर - उदय), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. आरिफ शौकत महात - विवेक), सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, जि. सातारा (डॉ. एम. एम. राजमाने, डॉ. दिलीपकुमार कसबे - सद्गुरू)

व्यावसायिक गट : तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, वारणानगर, जि. कोल्हापूर (डॉ. एस. व्ही. अणेकर, डॉ. बाळासो साळोखे - होरायझन), आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, आष्टा, जि. सांगली (डॉ. व्ही. एस. पाटील, डॉ. एस. एस. मोहिते -ज्ञानदारंभ), डी. के.टी.ई.चे टेक्स्टाईल ॲण्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट, इचलकरंजी, जि. कोल्हापूर (डॉ. श्रीमती एल. एस. अडमुठे, डॉ. आर. डी. शिर्के - अंबर)

30 NOV 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत जिल्हा दौऱ्यावर

प्रतिनिधी
कोल्हापूर

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत हे आज, गुरुवारपासून जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. यावेळी ते देवदर्शनासह विविध बैठका, कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री सावंत यांचे आज, गुरुवारी दुपारी कोल्हापूर येथे आगमन होणार आहे. यानंतर दुपारी ४ ते ४.३० वाजता सार्वजनिक बैठक, यानंतर ४.३० वाजता नृसिंहवाडीकडे प्रयाण व दर्शन, पुढे सांगलीकडे प्रयाण, तेथून रात्री पुन्हा कोल्हापूरकडे प्रयाण होऊन रेसिडेन्सी क्लबकडे मुक्काम राहणार आहे.

उद्या, शुक्रवारी सकाळी ६.४५ वाजता श्री. अंबाबाई मंदिराकडे प्रयाण व दर्शन, येथऊन त्र्यंबोली देवी मंदिराकडे प्रयाण व दर्शन, त्यानंतर १०.३० वाजता शिवाजी विद्यापीठ येथील कार्यक्रमास उपस्थिती, येथून भोसले हाऊस, तुळजाई बिल्डींग येथे बैठकीस उपस्थिती, सायंकाळी ५.४५ वाजता प्रायव्हेट हायस्कूल येथील कार्यक्रमास उपस्थिती,



यानंतर रेसिडेन्सी क्लबकडे प्रयाण होऊन काही काळ थांबून रात्री गोवा कडे मुख्यमंत्री सावंत यांचे प्रयाण होणार आहे.

3 0 NOV 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नव्या धोरणात समूह विद्यापीठाचा थाट; कशाला हवा उपकेंद्रांचा घाट

## शिवाजी विद्यापीठाच्या सांगली उपकेंद्राबाबत शिक्षणतज्ज्ञांचा सूर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नव्या शैक्षणिक धोरणामध्ये चार-पाच महाविद्यालयांचे मिळून समूह विद्यापीठ (क्लस्टर युनिव्हर्सिटी) निर्माण करण्याची शिफारस करण्यात आली आहे. या समूह विद्यापीठासाठी काही महाविद्यालयांनी तयारीही सुरू केली आहे. असे असताना शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सांगली व सातारा जिल्ह्यांत करण्यासाठी वाढणारा जनरेटा पाहता समूह विद्यापीठांच्या भाऊगर्दीत या उपकेंद्रांचे महत्त्व किती उरेल? असा प्रश्न उपस्थित होत आहे. समूह विद्यापीठांमुळे मूळ विद्यापीठाकडेच जास्त काम राहणार नसले तरी समूह विद्यापीठाच्या अंमलबजावणीस लागणारा वेळ पाहता उपकेंद्रे गरजेचे असल्याचा सूर शिक्षणतज्ज्ञांमधून उमटत आहे.

शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र सांगली जिल्ह्यात करण्यासाठी सध्या हालचाली वाढल्या आहेत. त्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने समितीही स्थापन केली आहे. मात्र, नवे शैक्षणिक धोरण २०२० मध्ये चार महाविद्यालयांचे मिळून समूह विद्यापीठ करा, अशी शिफारस करण्यात आली आहे. नव्या शैक्षणिक धोरणात 'विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये' ही संकल्पनाच मोडीत निघाली आहे. त्यामुळे विद्यापीठाशी संलग्न सर्व शिक्षण संस्थांना स्वत: पदवी प्रदान करता यावी, यासाठी समूह विद्यापीठे स्थापन करण्याचे सरकारचे धोरण आहे. असे झाले तर मूळ विद्यापीठाला फारसे काम उरणार नाही. त्यामुळे अस्तित्वात असलेली उपकेंद्रेही बंद करावी लागतील.

अशा उतरणीच्या काळात नव्याने उपकेंद्र स्थापन करून सरकार त्यावरील खर्चाचा भार का उचलेल? असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. (उत्तरार्ध)

### उपकेंद्राची का होतेय मागणी?

शिवाजी विद्यापीठाने परीक्षा फॉर्मपासून ते शुल्क भरण्यापर्यंतची सर्व सुविधा ऑनलाइन केली आहे. महाविद्यालयांचे विद्यापीठाशी असणारे कार्यालयीन कामकाजही बहुतांश प्रमाणात ऑनलाइन झाले आहे. त्यामुळे विद्यार्थी, महाविद्यालय प्रशासनाला विद्यापीठात वारंवार माराव्या लागणारे हेलपाटे बंद झाले आहेत. सांगली व सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी विद्यापीठातच यावे लागते. असे गरजेचे अभ्यासक्रम या उपकेंद्रांमधून सुरु व्हावेत; अशी या दोन जिल्ह्यांची मागणी आहे.

### जबाबदारी घेणार की झटकणार?

समूह विद्यापीठ निर्माण करून नवे अभ्यासक्रम तयार करणे, नवे शैक्षणिक प्रयोग करणे, याचे स्वातंत्र्य महाविद्यालयांच्या समूहाला असेल. समूह विद्यापीठे स्थिरस्थावर झाली की यातून मनुष्यबळाचा आर्थिक भारही सरकार काढून घेणार आहे. त्यामुळे एकीकडे स्वत:कडील जबाबदारी सरकार महाविद्यालयावर झटकत असताना उपकेंद्र स्थापन करून ती स्वत:हून ओढवून घेईल का, याबाबत शंका आहे.

समूह विद्यापीठांमध्ये किती महाविद्यालये सहभागी होतात, हे पाहावे लागेल. मुळात या संकल्पनेला खूप मर्यादा आहेत. विद्यापीठाचे उपकेंद्र झाले की परिसरातील विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होतो.

-डॉ. बी. एम. हिर्डेकर,
शिक्षणतज्ज्ञ, कोल्हापूर.



नव्या शैक्षणिक धोरणातील समूह विद्यापीठांची अंमलबजावणी होण्यास बराच अवधी जाणार आहे. विद्यापीठाच्या उपकेंद्रांनी परिसरातील महाविद्यालयांसमोर एक मॉडेल म्हणून काम करणे आवश्यक आहे.

-डॉ. माणिकराव साळुंखे,
माजी कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2023
तरुण भारत




कोल्हापूर : 'महात्मा जोतिबा फुले यांचे साहित्यविषयक विचार' विषयावर बोलताना डॉ. नंदकुमार मोरे सोबत ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, प्रशासक राजदीप सुर्वे.

# महात्मा फुलेंचे साहित्य म्हणजे ज्ञानाचे भांडार : डॉ. नंदकुमार मोरे

कोल्हापूर : महात्मा फुले यांचे साहित्य समाजाचे वास्तव मांडणारे आहे. त्यांचे साहित्य म्हणजे शैक्षणिक, सामाजिक, वैचारिक, शेतकरी समस्या, धार्मिक व सामाजिक सुधारणा धोरणाच्या ज्ञानाचे भांडार आहे. त्यांनी स्त्री-पुरुष समानता, स्त्री शिक्षणाचा पाठपुरावा, त्रिभाषा सुत्रांचा अवलंब, शेतकरी समस्या, सामाजिक परिवर्तन, बांधीलकी, समाजातील पीडितांची व्यथा साहित्यातून मांडली, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी व्यक्त केले. महात्मा फुले यांच्या १३३ व्या स्मृतीदिनानिमित्त राजर्षी शाहू मेमोरियल ट्रस्टच्यावतीने आयोजित 'महात्मा फुले यांचे साहित्यिक विचार' या विषयावर व्याख्यानमालेत ते बोलत होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. येथील शाहू स्मारक भवन मध्ये मंगळवारी हे व्याख्यान पार पडले. डॉ. मोरे म्हणाले, आधुनिक महाराष्ट्राच्या जडण-घडणीसाठी महात्मा फुले यांचे योगदान मोलाचे आहे. महात्मा फुलेंचे साहित्य राजकीय, सामाजिक, शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वांनी अनुकरनिय असे आहे. महात्मा जोतिबा फुले यांच्या साहित्यातून प्रकट होणारे विचार स्वातंत्र्य, समता आणि बंधुभावावर विश्वास ठेवणारे व सामाजिक आणि धार्मिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे आहे. डॉ. चौसाळकर म्हणाले, महात्मा फुलेंचे सत्यशोधक विचारामुळे साजिक एकोपा, बांधीलकी टिकून आहे. फुलेंनी स्त्री शिक्षणाचा पाया रचत स्त्रीयांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य दिले. त्यांचे आचार-विचार आत्मसात करण्याची आजही गरज आहे. सुत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. शाहू स्मारक भवनचे प्रशासक राजदीप सुर्वे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अवनिश पाटील, प्रा. किसनराव कुराडे, नामदेवराव कांबळे, कॉम्रेड चंद्रकांत यादव आदी उपस्थित होते.

3 0 NOV 2023 — पुण्यनगरी — जनसंपर्क कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा संशोधकांनी परिषदांमधील ज्ञानाचा लाभ उठवावा

## डॉ. सुधिंद्रा रायप्रोल : राष्ट्रीय परिषदेची सांगता




कोल्हापूर : प्रतिनिधी

विविध प्रकारच्या राष्ट्रीय परिषदांमध्ये युवा संशोधकांनी जास्तीत जास्त भाग घ्यावा व जगभरात होत असलेल्या नवनवीन संधींची माहिती करून घ्यावी. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होईल, असे प्रतिपादन यूजीसी मुंबईचे डॉ. सुधिंद्रा रायप्रोल यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात झालेल्या दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या सांगता समारंभप्रसंगी ते बोलत होते.

सकाळच्या सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठ रिसर्च, डेव्हलपमेंट फाऊंडेशन (सेक्शन ८ कंपनी) यांच्या विद्यमाने प्रा. बी. एन. थोरात (आय.सी.टी., मुंबई) यांचे इनोव्हेशन, इन्क्युबॅशन, एंट्रीप्रनोरशिप आणि स्टार्टअप इकोसिस्टीम या विषयावर व्याख्यान झाले. तसेच डॉ. नीतू झा (आय.सी.टी., मुंबई) यांनी कार्बन पदार्थांच्या साहाय्याने पाणी शुद्धीकरणासाठीच्या यंत्रांची माहिती दिली, तसेच डॉ. एम. व्ही. कुलकर्णी सी-मेट, पुणे यांनी पॉलिमर व त्यांचे कंपोझिट यांचे महत्त्व व्यवहारातील उदाहरणांसह विशद केले.

परिषदेत झालेल्या मौखिक सादरीकरणामध्ये ऋतुजा गंभीर यांनी प्रथम, सुशांत पाटील यांनी द्वितीय, तर केतन कुमार गायकवाड यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तसेच पोस्टर सादरीकरणामध्ये एन. एच. देहकोर्डी यांनी प्रथम, हर्षदा लोखंडे यांनी द्वितीय, तर ऋतुजा गुरव यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

संयोजक डॉ. एन. एल. तरवाळ यांनी परिषदेतील घडामोडींचा आढावा सादर केला. विभागप्रमुख प्रा. के. वाय. राजपुरे यांनी अध्यक्षस्थान भूषवले. याप्रसंगी वरिष्ठ प्राध्यापक डॉ. विजय फुलारी, प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे, सेक्रेटरी डॉ. आर. एस. व्हटकर यांच्यासह अनेक संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनी, वैज्ञानिक, शिक्षक उपस्थित होते. आभार डॉ. एस. एस. पाटील यांनी मानले, तर सूत्रसंचालन अश्विनी पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2023
पुढारी

# भावी शिक्षकांसाठी एकदिवसीय कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग व आजीवन शिक्षण आणि विस्तार अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भावी शिक्षकांसाठी एकदिवसीय कार्यशाळा झाली. कार्यशाळेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. या कार्यशाळेमध्ये प्रा. डॉ. तृप्ती करीकट्टी, प्रा. डॉ. ए. एम. गुरव, डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2023
लोकमत

# भावी शिक्षकांची कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग व आजीवन शिक्षण आणि विस्तार अधिविभाग यांच्यातर्फे भावी शिक्षकांसाठी एकदिवसीय व्यक्तिमत्त्व विकास आणि संप्रेषण कौशल्य कार्यशाळा मंगळवारी पार पडली. यात शिक्षणशास्त्र अधिविभागातील बी.एड्. एम.एड. (एकात्मिक) व एम.एड्. अभ्यासक्रमाचे तसेच कोल्हापूर शहरांमधील अध्यापक विद्यालयांचे व महाविद्यालयांचे असे ८० प्रशिक्षणार्थी सहभागी झाले. उद्घाटन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. डॉ. तृप्ती करीकट्टी, प्रा. डॉ. ए. एम. गुरव आणि डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी मार्गदर्शन केले. शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. पाटणकर व आजीवन शिक्षण आणि विस्तार अधिविभागचे संचालक प्रा. डॉ. आर. जी. पवार यांनी याचे आयोजन केले होते. डॉ. आर. यू. संकपाळ, वाय. एस. बोकील व डॉ. एन. एस. माळी यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 NOV 2023
पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने १०१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आजअखेर घेण्यात आलेल्या १०१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. बुधवारी या पथकांकडून सांगली जिल्ह्यातून ७, सातारा जिल्ह्यातून ५ अशा एकूण १२ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आलेली नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हा
30 NOV 2023
तरूण भारत

# 'केएमसी'च्या अंकिताला कुस्तीत सुवर्णपदक



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २३ नोव्हेंबर २०२३ रोजी सांगलीतील कडेपूर येथील आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज येथे विभागीय कुस्ती स्पर्धा झाल्या. या स्पर्धेमध्ये महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण (के. एम.सी.) महाविद्यालयाच्या अंकिता जाधव हिने ५९ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावले. या स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सांगली सातारा व कोल्हापूर विभागातील महिला खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अंकिताची पंजाब येथे २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२३ रोजी होणाऱ्या पश्चिम विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिचा सत्कार विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.अरुण पौडमल यांच्या हस्ते करण्यात आला. प्राचार्य डॉ.अरुण पौडमल व प्रा. ए.डी.मुडे, प्रा.एस. पी. कांबळे यांचे प्रोत्साहन लाभले. तर शारीरिक शिक्षक संचालक डॉ. राम पवार यांचे मार्गदर्शन लाभले.